# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE (ECHO GROUP)

*India's National Spiritual Newspaper*

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. Shashi Tiwari

VOL: XXIV | YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, FEBRUARY 2022 | No. 01


## पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

नीतिसूत्रें २०:१:९

१. संकटाच्या दिवशी परमेश्वर तुझें ऐको; याकोबाच्या देवाचे नाम तुला उच्चपदी स्थापो;

२. पवित्रस्थानांतून तो तुला साहाय्य पाठवो, सीयोनांतून तो तुला आधार देवो;

३. तो तुझ्या सर्व अर्पणांचे स्मरण ठेवो, तुझा होम त्याला मान्य होवो;

४. तुझा मनोरथ तो पूर्ण करो, तुझे सर्व संकल्प सिद्धिस नेवो.

५. तू सिद्ध केलेल्या तारणामुळें आम्ही जयोत्स्तव करु; आमच्या देवाच्या नामाचा ध्वज उभारुं; तुझ्या सर्व मागण्या परमेश्वर पुऱ्या करो.

६. परमेश्वर आपल्या अभिषिक्ताला तारितो, हे मला आता कळून आले; तो आपल्या उजव्या हाताच्या उद्धारक प्रतापाची कृत्ये करुन आपल्या पवित्र स्वर्गातून त्याचे एकेल.

७. कोणी रथाची व कोणी घोड्यांची प्रशंसा मिरवितात; आम्ही तर आमचा देव परमेश्वर याच्या नामाची प्रशंसा करु.

८. ते वाकून खाली पडले आहेत; आम्ही तर उठून ताठ उभे आहोत.

९. हे परमेश्वरा, तारण कर आम्ही धावा करितो तेव्हां राजाने आमचे ऐकावे.

## येशूची वंशावळी का केवळ अब्राहाम आणि दाविद यांच्या आगोदर आहे?

(Why the genealogy of Jesus Christ Precedes Abraham and David only ?)

**बंधु एम्. पॉलराज**

मत्तयकृत शुभवर्तमान वचन १:१ येशूची वंशावळी... "येशू ख्रिस्त जो दाविदाचा पुत्र, जो अब्राहामाचा पुत्र, त्याची वंशावळी" असे वाचण्यात येते. येशूच्या वंशावळीत अब्राहामापूसन ते योसेफा पर्यंत एकूण ४२ पिढ्यांचा समावेश आहे. ४२ पिढ्यांमधून देवाने केवळ अब्राहाम, दाविद आणि येशू ख्रिस्त या तीन वंशाचीच निवड केली. म्हणजे हि तीन नावे टाळता न येण्या इतकी अत्यंत महत्त्वाची होती. होय, हि नावे अतिशय विशेष, वजनदार आणि महत्त्वाची अशी आहेत. अब्राहाम, दाविद आणि येशू ख्रिस्त या बाबीकडे बारकाईने पाहू या!

### अब्राहाम!

अब्राहाम हा खास्द्यांच्या येथील रहिवासी तेरह याचा पुत्र होता. हा पूर्ण देश मूर्तिपुजकांनी भरलेला होता. असे असताना देखील देवाला त्यांच्यामधून अब्राहाम या नीतिमान माणसाला निवडून त्याला दूर देशात जाण्यासाठी पाचारण करणे आवडले. देवाने त्याला वचन दिले. कि तो त्याज पासून मोठे राष्ट्र निर्माण करील, त्याचे कल्याण करील, व त्याचे नाव मोठे करील. (उत्पत्ति १२:१-३ प्रे.कृ ७:२-४) पाचारण जरी अब्राहामाला होते, त्याच्या वडिलांनी त्याला त्याची पत्नी साराय आणि नातू लोट यांना घेऊन खास्द्याच्या उर गावांतून कनान देशास जाण्यास निघाला आणि हाशन येथे काही काळ राहिला. ते सर्व हायन येथे ३० ते ४० वर्षे वस्ती करुन राहिले व पुष्कळ संपत्ति जमविली तेरहाच्या मृत्युनंतर देवाचे अब्राहामाला परत एकदा पाचारण झाले. (उत्पत्ति १२:१-३) तरी देखील अब्राहामाने त्याच्या पत्नी सोबत लोट याला देखील घेतले! हे देवाने दिलेल्या पाचारणास डावलण्या सारखे होते. देव अब्राहामाशी संतुष्ट नव्हता. देव इतरांबरोबर मिसळलेल्या कुटुंबाला आशीर्वाद देऊ शकत नाहि. येथे दृष्टिक्षेप बदलेल. मग कुटुंब असो किंवा व्यवसाय असो. अशाहि स्थितीत देव आब्राहामा सोबत होता. त्याच्या कुटुंबाने कनान मध्ये प्रवेश केला व शरवेमात वस्ती केली. तेथून त्याने बेथेल येथे डेरा दिला. देव तेथे त्याला दर्शन देऊन म्हणाला हा कनान्यांचा देश मी तुझ्या संतानाला देणार (उत्पत्ति १२:७)

आब्राहाम कळप, रुपे व सोने याहीकरुन संपन्न होता. आब्राहामबरोबर लोट चालला होता त्याचीहि मेंढरे, गुरेढोरे व पाले होती. त्यांची मालमत्ता एवढी झाली की त्यांस एका स्थळी राहाता येईना. आब्राहामाच्या व लोटाच्या गुराख्यांची भांडणे होऊ लागली तेव्हा त्यांनी शांतीने एकमेकांपासून

(ऊरवरीत पान ३ वर)

# ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)



## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...

### ''मी आपल्या... लोकांचा बंदिवास पालटीन...' आभास (९:१४)



प्रभुमधील अती प्रिय बंधुंनो आणि बहिणींनो,

आपल्या प्रभु व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताचे नाम गौरविले जावो. आम्ही '**एको ऑफ हिज कॉल**' मासिकाच्या द्वरे त्याच्या नामात तुम्हां सर्वांना शुभेच्छा देत आहोत.

देवाने डिसेंबर २०२१ आणि जानेवारी २०२२ या दोन्ही महिन्यांतील आमचे सर्व कार्यक्रम आशीर्वादीत केले. आमच्या शब्बाथ शाळेच्या सेवाकार्य, **नहेम्या बायबल कालेज**, (हिन्दी ऑनलाइन आभ्यासक्रमाच्या विद्यार्था) सोबत ख्रिस्त जन्मदिन आणि नूतन वर्षाच्या सभा आश्चर्यकारक अशा झाल्या.

३ जानेवारी २०२२ रोजी सुरुवात करण्यात आलेला आमचा हिन्दी भाषिक आभ्यासक्रम देव आशीर्वादीत करीत आहे. हा आभ्यासक्रम उत्तर भारतीय हिन्दी भाषिक विद्यार्थी जे नियमीत घेण्यात येत असलेल्या आभ्यासक्रमात सहभागी होऊ शकत नाहित अशा साठी खास करुन सुरु करण्यात आलेला आहे.

देवाने आम्हाला शब्बाथ झाला सेवे करिता बहिणींचा एक गट उपलब्ध करुन दिला आहे. त्या गटाचे छायाचित्र खाली छापण्यात आले आहे, यासाठी कि, तुम्ही त्यांच्या करिता प्रार्थना करावी.



आम्ही नहेम्या बायबल कॉलेजचे अध्यक्ष, पास्टर एम. मुथ्थु आणि इंग्रजी मासिकाचे सहसंपादक बंधु एम. पॉलराज या उभयतांच्या जलद प्रकृति स्वास्थ्य लाभावे यासाठी प्रार्थना करु इच्छितो. ते आमच्या विविध कार्यांचे आधारस्तंभ आहेत.

आम्ही तुम्हा सर्वा करिता प्रार्थना करित आहोत आणि तुमच्या जीवनात महान अशा गोष्टि घडून याव्यात अशी अपेक्षा करित आहोत.

देव तुम्हाला आशीर्वाद देवो.

तुमच्याकडून ऐकण्याची आशा करीत आहोत.

**ख्रिस्त येशूमधील तुमचे दास,**

**पास्टर एस. सॅम सेलवा राज आणि ॲलेक्स सॅमसन सॅम**

(+91) 98412 71858 / 98410 71858 E.mail : samselvaraj333@gmail.com

### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

CHIEF EDITOR
Angeline Selvakumari Henry, M.A., M.Ed.
MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
ADMINISTRATION
Bro. N. Prakasam, M.A., General Manager
EDITORIAL BOARD
Sis. Jesy Veena Sam
Bro. M. Paulraj, M.A., B.Ed.
Sis. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.

EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 95661 31858
E.mail ID
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

Our Ministries: ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) Online Courses Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners St. Paul's Matriculation School Crusades Community Development

(पान १ वरुन)

विभक्त होण्याचा निर्णय घेतला. लोटाने सदोम व गमोरा आणि यादनेची तळवट पसंद केली.

एकूण पाच राजे एकत्रीत झाले आणि त्यांनी सदोम व गमोरा येथील मालमत्ता व सगळी अन्नसामुग्री लुटून घेऊन गेले. त्यांनी लोट याला त्याच्या पत्नीला धनदौलतीसह धरुन नेले. आब्राहामाला जेव्हा हे कळले; त्याने त्याच्या सोबत ३१८ प्रशिक्षित सेवकांना घेऊन दानापर्यंत शत्रूचा पाठलाग केला. त्याने त्यांजवर रात्रीची चाल करुन त्यांस दिमिष्कच्या उत्तरेस होबा शहरापर्यंत मार देत गेला आणि लोटासहित, सर्व मालमत्ता, स्त्रिया व लोक माघारे आणिले.

आब्राहाम माघारे येत असताना शालेमाचा राजा मलकीसदेक जो परात्पर देवाचा याजक देखील होता; भाकर व द्राक्षरस घेऊन त्याला सामोरा आला, त्याला आशीर्वाद दिला. तेव्हा आब्राहामने त्याला अवघ्याचा दहावा भाग दिला. (उत्पत्ति १४:१६-२०)

## हा मलकीसदेक कोण होता?

मलकीसदेक हा शालेमाचा राजा आणि परात्पर देवाचा याजक देखील होता. अब्राहामाने त्याला अवघ्याचा दहावा भाग दिला. त्याच्या नामाचे भाषांतर धार्मिकतेचा राजा असे देखील केले जाते; आणि शालेमाचा राजा म्हणजे शांतिचा राजा असे देखील केले जाते. त्याच्या आई-वडिलाचा किंवा वंशावळीचा, किंवा जीवनाच्या सुरवातीचा किंवा शेवटाचा उल्लेख केलेला सापडत नाहि. परंतु त्याला देवाच्या पुत्राप्रमाणे केले गेले आहे. तो सतत याजक म्हणून रहातो. अशाप्रकारे देवाने त्याला धार्मिकतेचा राजा आणि शांतिचा राजा बनविले आणखीन पुढे, देवाने त्याला आब्राहामाला आशीर्वाद देण्याकरिता साधन असे बनविले जरी इतर दोघे, दाविद आणि येशू ख्रिस्त यांना मलकीसदेका द्वारे आशीर्वाद दिलेला दिसत नसला तरी दोघांचीहि एकाच वेळी राजा आणि याजक असे दुहेरी काम पार पाडले.

## राजा आणि याजक!

देवाच्या राज्यामध्ये प्रभु येशू ख्रिस्त आपल्याला आपला देव व पिता याचे राजे आणि याजक असे बनविणार (प्रकटि १:६) किती महान असा हक्क आपल्याला प्राप्त होणार?

दाविद राजाने राजा आणि याजक अशा दोनहि जबाबदाऱ्या पार पाडल्या. राजा या नात्याने त्याने देवाचा कोश यरुशलेमात आणिला. त्याप्रसंगी याजक खांद्यांवर देवाचा कोश वाहून नेत असताना दाविद कोशापुढे नाचला. राजवस्त्र काढून टाकून दाविद सणाचे एफोद कमरेस वेष्टून परमेश्वरासमोर आवेशाने नृत्य करीत चालला. अशाप्रकारे स्वत:स नम्र केले. त्याने परमेश्वरास होमबळी व शात्यर्पणे अर्पिली. त्यानंतर दाविदाने बांधिलेल्या मंडपात यरुशलेमात कोश ठेवण्यात आला. दाविदाने जरी राजा व याजक अशा दोनहि जबाबदाऱ्या सांभाळल्या, तरी देखील तो सतत युद्ध करण्यात गुंतलेला असल्यामुळे त्याच्या देशाला शांतता उपभोगता आली नाहि. खरे तर त्याच्या हातून बराच रक्तपात घडला असल्यामुळे देवाने त्याला मंदिर बांधण्यास परवानगी दिली नाहि.

## प्रभु येशू ख्रिस्त!

जखऱ्या ९:९ या वचनात आपण येशूला 'राजा' असा पहातो आणि इब्री ७:१६, १७ या वचनांत त्याला याजक असा पहातो. हजार वर्षाच्या काळात तो राजा आणि याजक अशी दोनहि कामे करणार दाविद राजाने भविष्य करुन म्हटले, ''मलकीसदेकाच्या संप्रदाया प्रमाणे तूं युगानुयुग याजक आहेस (स्तोत्र ११०:४)

## नव्या कराराची स्थापना!

अब्राम ९९ वर्षांचा झाला असताना परमेश्वर त्याला दर्शन देऊन म्हणाला, ''मी सर्वसमर्थ देव आहे, तूं माझ्यासमोर आहेस हें मनांत वागवून चाल व सात्त्विक राहा.'' हि अब्रामाला देवाकडून प्रत्यक्षात ताकीद होती, कारण संतान देण्याबद्दल देवाने त्याला दिलेल्या अभिवचनाच्या पूर्ततेमधील वाट पहाण्याचा कालावधीत त्याने देवाचे सर्व आज्ञाचे पालन केले नाहि. अब्रामाने कामात खालील हयगय केली, त्यामुळे त्याला दिलेले अभिवचन पूर्ण होण्यास विलंब लागला.

१) कनानात तीव्र दुष्काळ पडला, तेंव्हा अब्रामाने त्याची पत्नी साराय आणि पुतण्या लोट यांना घेऊन मिसर देशात गेला. तो मिसर देशात प्रवेश करणार, तो तो आपली बायको साराय हिला म्हणाला, तूं दिसावयाला सुंदर स्त्री आहेस, तेव्हा मिसरी लोक हि त्याची बायको आहे असे म्हणतील व मला मारुन टाकून तुला जिवंत ठेवितील; तर मी याची बहिण आहे असे सांग. फारोच्या सरदारांनी तिला पाहून फारोकडे नेले. तेथे ती राजवाड्यात कांहि दिवस होती. तिच्यामुळे फारोने अब्रामाचे बरे केले; त्याला मेंढरें, बैल, गाढव, दास, दासी, गाढवी व उंट मिळाले. दासींमध्ये हागार एक दासी होती. देवाने सारायमुळे फारो व त्याचे घराणें यांस भारी पीडा भोगावयास लाविली. फारोला त्याच्या पापाची जाणीव झाली; आणि त्याने

## TAX EXEMPTION

Donations by any individual or organization from India to **Echo of His Call Educational Trust** are eligible for Income Tax exemption under Section 80G of the Income Tax Act. Official receipts will be issued for this purpose. Please make your Demand Drafts / Cheques / M.O. for such donations in favour of **Echo of His Call Educational Trust** and send to us.

| | | |
|---|---|---|
| **Account Name** | : | **ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | : | **1023 2923 805** |
| **Bank Name** | : | **STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | : | **TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | : | **SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | : | **SBI NIN BB 455** |

अब्रामास मिसर देशशतून वाटेस लाविले व सारास अब्रामास परत दिली. येथे मिसर देशात जाण्या अगोदर अब्रामाने देवाचा सल्ला घेतला नाही.

२) त्यानंतर परमेश्वरानें अब्रामास दृष्टशंत रुपाने सांगितले कि मी तुला आशीर्वाद देणार. त्यावर आब्राम म्हणाला मी तर असंतान गत होणार आणि अलियेजर हा माझ्या घरचा वारस होणार. परमेश्वराचें वचन त्यांस प्राप्त झाले कि हा मनुष्य नाही, तर तुझ्या पोटी येणाराच तुझा वारस होईल मग त्याला बाहेर आणून म्हटले, आकाशाकडे दृष्टिलाव, तुझी संतति इतकी होईल. (उत्पत्ति १५:१-१५) अब्रामास वचन प्राप्त झाले तेव्हा तो ७५ वर्षांचा होता.

३) अभिवचन देण्यात आलेला मुलगा पुढे येत नसलेला पाहून साराय व अब्राम अधीर होऊ लागले. सारायने आपली दासी हाग्गार हिस अब्रामाला दिले. आब्रामाने देखील विरोध केला नाहि! त्याने तीला जाणीले आणि तिजपासून अब्रामाला वयाच्या ८६व्या वर्षी इश्माएल झाला.

देव संतुष्ट नव्हता; देव अब्राम ९९ वर्षांचा होई पर्यंत त्याजशी बोलला नाहि. त्या काळात आणखीन एक विवाह करणे पाप नव्हते. परंतु येथे मुख्य पात्र अब्राम होता, ज्याला देवाने एका उच्च कार्याकरिता निवडीलेल होते. येथे आब्रामाने देवाची आज्ञा मोडिली.

याच कारणामुळे देव इच्छीत होता कि आब्रामाने त्याजसमोर सात्त्विक बनून चालावे. देवाने त्याच्याशी करार स्थापिला तो हा तुमच्यांतील प्रत्येक पुरुषाची सुंता व्हावी, करारानुसार त्याची अगणित अशा वाढ करणार होता. देवाने ‘अब्रामाचे’ नाव बदलून ‘अब्राहम’ असे केले. कारण यापूढे राष्ट्रसमूहाचा जनक असे केले. आणि सारायचे नाव सारा (राषी) असे बदलले कारण देव म्हणाला मी तीला धन्य करीन, तिच्यापासून राष्ट्रे उभ्दवतील, तिच्या पासून राष्ट्रांचे राजे निपजतील. (उत्पत्ति १७:१-१६) देवाने दिलेल्या अभिवचनानुसार आब्राहामाला सारेपासून पुत्र झाला. त्याचे नाव त्याने ‘इसहाक’ ठेविले. त्या वेळेस अब्राहाम १०० वर्षांचा व सारा ९० वर्षांची होती. परमेश्वराला कांही असाध्य नाहि!

## सर्वोच्च कसोटी

आता देव आब्राहामास कसोटीस लावीत होता. देवत्याला म्हणाला, तुझा पुत्र, तुझा एकुलता एक प्रिय पुत्र इसहात यास घेऊन मोरिया देशात जा आणि मी तुला सांगेन त्या डोंगरावर त्याचे होमार्पण कर. हे शब्द त्याच्या मस्तकावर जणू गडगडणाऱ्या विजेप्रमाणे कोसळले असतील. परंतु त्याचा दृढ विश्वास होता, ज्याने त्याला तो पुत्र दिला तो त्याला असहाय, एकाकी पडू देणार नाहि.

आब्राहामे मोठ्या पहाटेस उठून आपला पुत्र इसहाक यांस घेतले आणि होमार्पणासाठी लाकडे फोडून घेतली व देवाने सांगितलेल्या ठीकाणी जाण्यास निघाला. दोघे डोंगर माथ्यावर गेल्यावर इसहाकाने आपला बाप अब्राहाम यांस म्हटले, ‘‘बाबा! विस्तव व लाकडे आहेत पण होमबलीसाठी कोकरुं कोठे आहे?’ आब्राहाम म्हणाला ‘‘बाळा, देव स्वत: होमबलीसाठी कोकरुं पाहून देईल.’’

आब्राहामाने वेदी उभारली, तिजवर लाकडे रचिली आणि आपला पुत्र इसहाक यास बांधून वेदीवरच्या लाकडांवर ठेविले; मग आब्राहामाने आपला पुत्र वधण्यासाठी हात पुढे करुन सुरा घेतला. तेव्हा परमेश्वराच्या दूतानें त्यास आकाशांतून हाक मारुन म्हटले, अब्राहामा! अब्राहामा! तूं आपल्या मुलावर हात चालवूं नको, कारण तूं आपल्या एकुलत्या एका पुत्रांसहि मला अर्पिलयास मागेपुढें पाहिले नाही. यावरुन तूं देवाला भिऊन चालणारा आहेस हे मला दिसून झाले.’’ पवित्र शास्त्र सांगते, देवाने त्याला त्याच्या पुत्राचे अर्पण करण्यास सांगितले, ‘‘तेव्हां मेलेल्यांतून देखील उठवावयास देव समर्थ आहे असे त्याने लक्षांत आणिले आणि त्या स्थितीतून उपमेनें तो त्याला परत मिळाला.’’ (इब्री ११:१७-१९) आब्राहामानें देवावर विश्वास ठेविला आणि ते त्याला नीतिमत्व असे मोजण्यात आले.’’ (गलती ३:६) आणि देवाने अब्राहामाला सर्वराष्ट्रांचा बाप असे केले.

ज्याला देवानें उत्पन्न केले, तो आदाम, आज्ञाभंगामुळे अपयशी ठरला. नोहाची पीढि आणि त्याचे वंशज (नोहा नीतिमान होता) अपयशी ठरले. तेव्हां देवाने स्वास्थ्यांमधून एका नीतिमान मानसाला

*....Contd. to page 6*


# नहेम्या बाईबल कॉलेज

**निवासी आणि सायंकाळीन कॉलेज**
**वेलाचेरी आणि चेपॉक संतोषपुरम**

ECHO OF HIS CALL (ECHO GROUP)

माध्यम : हिंदी/इंग्लीश

Regd. Candidate for Membership ATA NEHEMIAH BIBLE COLLEGE CHENNAI ECHO OF HIS CALL ★ Estd. 1969 ★

विद्यार्थी ATA सभासद नोंदणीस पात्र
**आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि**
**वरिष्ट पाळकांद्वारे ५३ वर्षांपासून मान्यता प्राप्त**

**सर्टिफिकेट इन थियॉलॉजी : कालावधी एक वर्ष**
**डिप्लोमा इन थियॉलॉजी : कालावधी दोन वर्षे**

**शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक**
**प्रवेशा करिता त्वरा करा !**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**
**10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.**
**Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858**
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

✲ ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे ✲

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

प्रार्थना स्तुति आणि मुद्दे १९ फेब्रुवारी २०२२ ते १८ मार्च २०२२ पर्यंत

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## स्तुति करिता मुद्दे

१९ फेब्रुवारी : मुख्य मंडळीतील आमच्या कार्याविषयी समविचारी सभासद देऊन आशीर्वादित केल्याबद्दल प्रभुची स्तुती असो.

२० फेब्रुवारी : आमच्या १९६९ सालापासूनच्या मासिक सेवेवर विपुल आशीर्वाद देत आल्याबद्दल देवाचे आभार मानू या.

२१ फेब्रुवारी : आमच्या पत्रव्यवहारा द्वारे करण्यात येत असलेल्या बायबल कोर आणि थियॉलॉजीकल अभ्यासक्रमा करिता नवीन विद्यार्थी पुरविल्याबद्दल स्तुती करु या.

२२ फेब्रुवारी : एको ऑफ हिज कॉल मासिकाच्या सर्व सहसंपादक व त्यांच्या कुटुंबियांबद्दल स्तुति करु या.

२३ फेब्रुवारी : सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुलचे शिक्षक, स्टाफ आणि प्रिन्सिपल अशा सर्वांबद्दल स्तुति करु या.

२४ फेब्रुवारी : आमच्या सर्व प्रार्थना साथीदार, वर्गणीदार, विश्वासातील साथीदार, आजीव भागीदर आणि महान आशा पालनातील भागीदार आणि कुटुंबियांबद्दल स्तुति करु या.

२५ फेब्रुवारी : आमच्या कर्मचाऱ्यांवरील प्रभुच्या विपुल आशीर्वादाच्या वृष्टी बद्दल त्याचे आभार मानू या.

२६ फेब्रुवारी : सर्व मंडळ्यांमधील पास्टर आणि सभासदांबद्दल स्तुति करु या.

२७ फेब्रुवारी : देव एकूण १६ भाषांमध्ये एको ऑफ हिस कॉल मासिक आमच्या मुद्रणालयांत छापणे शक्य होऊ देत आहे, त्याबद्दल स्तुति करुया.

२८ फेब्रुवारी : मागील महिन्यातील आमच्या सर्व गरजा पुरविल्याबद्दल स्तुति करु या.

०१ मार्च : आमच्या मुद्रणाल्यातील मशीन कुशल कारागिरांच्या कार्यक्षमतेमुळे सतत कार्यरत असल्याबद्दल देवाची स्तुति करु या.

०२ मार्च : आमच्या ऑनलाईन हिन्दी थियॉलॉजीकल अभ्यासक्रमावरील देवाच्या आशीर्वादाबद्दल स्तुति करु या.

०३ मार्च : सर्व दुष्ट शक्तिपासून देव आमच्या वरिष्ट पालक पास्टर एस्. सॅम्. सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबाचे रक्षण करीत आहे. प्रभुची स्तुति करु या.

## प्रार्थने करीता मुद्दे

०४ मार्च : सर्व ख्रिस्ती संस्थांच्या संरक्षणाकरिता प्रार्थना करा.

०५ मार्च : जागतिक ऐक्य आणि शांति करिता प्रार्थना करा.

०६ मार्च : आमच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या प्रकृति स्वास्था करिता प्रार्थना करा.

०७ मार्च : भारतामधील जेथे शुभवर्तमान पोहचले नाहि त्या ठिकाणी ते नेणे, आम्हाला शक्य व्हावे यासाठी प्रार्थना करा.

०८ मार्च : आमच्या सर्व भागीदार आणि राज्य समन्वयंकासाठी प्रार्थना करा.

०९ मार्च : आमच्या इंग्रजी मासिकाचे सहसंपादक बंधु एम्. पॉलराज यांना जलद प्रकृति स्वास्थ लाभावे यासाठी आग्रहि प्रार्थना करा.

१० मार्च : आमच्या सर्व सेवा कार्यक्रमांसाठी प्रार्थना करा.

११ मार्च : जगातील सर्व स्त्रियांच्या आणि लेकरांच्या सुरक्षितते साठी प्रार्थना करा.

१२ मार्च : देवाने या महिन्यातील आमच्या सर्व गरजा पुरवाव्यात यासाठी प्रार्थना करा.

१३ मार्च : जगातून करोना महामारीचे पूर्णपणे उच्चाटन व्हावे यासाठी प्रार्थना करा.

१४ मार्च : देने २००२ या नुतन वर्षात विपुल दया दर्शवावी यासाठी प्रार्थना करा.

१५ मार्च : देवाने आपल्या देशावर आणि अर्थव्यवस्थेवर आशीर्वाद द्यावा यासाठी प्रार्थना करा.

१६ मार्च : जगातील सर्व लोकांच्या सुरक्षितते करिता प्रार्थना करा.

१७ मार्च : नव्या ओमीक्रॉन मरी पासून देवाने आपल्या सर्वांना सुरक्षित ठेवावे यासाठी प्रार्थना करा.

१८ मार्च : आमचे वरिष्ठ पालक पास्टर एस्. सॅम सेल्वा राज आणी त्यांच्या सर्व कुटुंबियांना देवाने सर्व प्रकारच्या दुष्ट शक्तिपासून सुरक्षित ठेवावे यासाठी प्रार्थना करा.

....Contd. from page 4

निवडीले. अशासाठी त्याची सेवा करण्यासाठी पीढींच्या पीढि तयार व्हाव्यात. (स्तोत्र २२:३०) अशा तऱ्हेने अब्राहामाला राजा दाविद आणि येशू ख्रिस्त यांच्या मध्ये स्थान मिळाले. एक उंचा असा माणूस!

## राजा दावीद

इस्राएल लोकांसाठी देव राजा होता आणि शमुवेल हा शेवटचा शास्ता आणि संदेष्टा होता. इस्राएलची प्रजा शमुवेलाकडे येऊन, त्याच्याकडे राजाची मागणी करु लागली, जो त्यांच्या समोर असेल आणि इतर देशांप्रमाणे तो त्यांच्या साठी लढेल. त्यांच्या या मागणीमुळे शमुवेलाला वाईट वाटले. "जेव्हा परमेश्वर शमुवेलास म्हणाला लोक जे तुला सांगत आहेत ते सगळे ऐक; कारण त्यांत ते तुझा धिक्कार करीत नाहीत, तर मी त्यांचा राजा नसावे म्हणून ते माझाच धिक्कार करीत आहेत. (१ शमुवेल ८:७) तेव्हा बेंजामिन वंशातील किशाचा पुत्र शौल याला इस्राएलचा राजा निवडण्यात आले."

परमेश्वर शमुवेलाशी बोलला, आणि शौलास, ज्या अमालेकयानी इस्राएल मिसरातून कनानाकडे जात असताना मार्गात त्याजवर हल्ला करण्यासाठी टपून बसले होते, त्यांना शिक्षा करण्यास सांगितले. देवाला हवे होते कि शौलाने जाऊन त्याच्या सर्वस्वाचा विध्वस करावा. त्यांची गय करु नये. शौलाने अमालेक्यांचा राजा अगाग याला जीवंत पकडिले, आणि सर्व लोकांचा तरवारीने निखालस संहार केला. त्यांनी अगागाला जीवंत राखिले; त्याचप्रमाणे उत्तम उत्तम मेंढरे, बैल, पुष्ट पशु, कोकरे आणि जे जे कांही चांगले होते ते त्यांनी राखून ठेविले. जे काही टाकाऊ व कुचकामाचे होते त्याचाच त्यांनी अगदी नाश केला.

मग शमुवेलास परमेश्वराचें वचन प्राप्त झाले की "मी शौलास राजा केले याचा मला पस्तावा होत आहे, कारण मला अनुसरण्याचे सोडून देऊन त्याने माझ्या आज्ञा पाळिल्या नाहीत;" (१ शमुवेल १५:११) शमुवेल शौलाकडे आला तेव्हा शौल त्याला म्हणाला मी परमेश्वराची आज्ञा पाळिली आहे. शमुवेल म्हणाला तर शेरडामेंढरांचे बैबाबणे आणि गुरांचे हंबरणे माझ्या कानी पडत आहे याचा अर्थ काय?" (१ शमुवेल १५:१४) शौल म्हणाला आपला देव परमेश्वर याच्या प्रीत्यर्थ बलि अर्पण करण्यासाठी राखून ठेविली आहेत. परंतु शमुवेल म्हणाला. पाहा, यज्ञापेक्षा आज्ञा पाळणे बरें; एडक्याच्या वपेपेक्षा वचन ऐकणे बरे. अवज्ञा जादुगिराच्या पातकासमान आहे, आणि हट्ट हा मूर्तिपूजा व कुलदेव लार्चन यासारखा आहे." तू परमेश्वराचा शब्द मोडिला आहे म्हणून त्यानेहि तुला राजपदावरुन झुगारुन दिले आहे. (१ शमुवेल १५:२२, २३)

## दावीद अभिषिक्त राजा!

शमुवेल शौलासाठी विलाप करीत होता. परमेश्वराने शमुवेलास म्हटले तूं त्याच्यासाठी कोठवर शोक करीत राहणार? शिंगात तेल भरुन चल; मी तुला इशाय बेथलहेमकर याजकडे पाठवितो, तू त्याच्या एका पुत्रास माझ्याकरिता अभिषेक कर. शमुवेल बेथलहेमास गेला व निवडीच्या प्रक्रीयेस सुरवात केली. इशाय याला एकूण आठ पुत्र होते, त्यांच्या पैकी शेवटचा पुत्र दावीद होता, तो बापाची शेरडेमेंढरे राखण्यास गेलेला होता. शमुवेल इशयाच्या पहिला पुत्र अलीयान यास पाहून हाच परमेश्वराचा अभिषिक्त असे वाटले; परंतु परमेश्वराने शमुवेलास म्हटले तूं त्याच्या स्वरुपावर अथवा त्याच्या शरिराच्या उंच काठीवर जाऊ नकोस; कारण मी त्याला नापसंत केले आहे; मानववासारखें परमेश्वराचे पाहणे नसते; मानव बाहेरचे स्वरुप पाहतो पण परमेश्वर हृदय पाहतो." (१ शमुवेल १६:७) सातजण परमेश्वराने नापसंत केले, त्यापैकी कोणालाहि निवडिले नाहि. त्यानंतर दाविदाला बोलावून घेण्यात आले त्याचा वर्ण तांबूस, डोळे सुंदर व स्वरुप मनोहर होते. तेव्हा परमेश्वराने शमुवेलास म्हटले, उठ, त्यास अभिषेक कर, हाच तो आहे." शमुवेलाने सर्व भावांसमक्ष दाविदाला अभिषेक केला आणि त्या दिवसापासून पुढे परमेश्वराचा आत्मा दाविदाचे ठायी जोरानं संचरु लागला. जरी दाविदाला इस्राएलाचा राजा म्हणून अभिषेक करण्यात आला होता, शौल अद्यापी राजा म्हणून राजपदावर होता.

## दाविद गल्याथाचा वध करतो!

त्या दिवसात पलिष्टी लोकांनी युद्धासाठी आपल्या सेना एकवट केल्या आणि यहूदा देशांतील सोरतो व अजेकान यांच्या दरम्यान अफस-दम्मीन येथे छावणी दिली. इस्राएल लोकांनीहि एकवट होऊन एला नामक खोऱ्यात तळ दिला. जेव्हा पलिष्टी एका बाजूच्या पहाडावर व दुसऱ्या बाजूच्या पहाडावर इस्राएल लोक उभे राहिले; तेव्हा गथ एथला गल्याथ नामक एक महावीर पलिष्ट्यांच्या छावणीतून बाहेर आला; त्यांची उंची सहा हात एक वीत होती. त्याने त्याजशी लढण्याकरिता एका पुरुषाची निवड करण्याचे आवाहन केले. ते पलिष्टी चाळीस दिवसपर्यंत नित्य सकाळी व संध्याकाळी जवळ येऊन उभा राहत असे.

इस्राएल लोकांना त्या पलिष्ट्याशी जाऊन लढण्यास त्यांच्यात कोणीहि सापडेना, त्यांचे धैर्यस्वच आणि ते फार भयभीत झाले. इशाय याचे तीन पुत्र इस्राएलच्या छावणीत तळ देऊन होते. इशाय दाविदाला खाद्यपदार्थ घेऊन त्याच्या भावांचे क्षेम कुशल विचारण्यास युद्धाच्या स्थळी पाठवित असे. दाविदाने ते पलिष्टी देवाची निर्भर्त्सना करीत आहे ते ऐकले. "जो कोणी त्याला ठार मारील त्याला राजा बहुत धन देऊन संपन्न करील व आपली कन्या त्यास देईल." (१ शमुवेल १७:२६)

पलिष्टी करीत असलेल्या आवाहानाबद्दल दावीद विचारपूस करीत असल्याबद्दल त्याचे भाऊ त्याजवर रागावले. परंतु दावीद कचरला नाहि. तो शौलास म्हणाला "त्या पलिष्ट्यामुळे कोणाहि माणसाचे मन कचरुं नये; आपला दास जाऊन त्याजशी लढेल." (१ शमुवेल १७:३२) तो पुढे असेहि म्हणाला; "आपल्या दासाने सिंहास व अस्वलास मारुन टाकिले; हा असुंती पलिष्टी त्या दोघेपैकी एकासारीखा ठरेल, कारण त्याने जीवंत देवाच्या सेनांस तुच्छ लेखिले आहे.

(१ शमुवेल १७:३६)

दाविदाला त्या पलिष्ट्यावर विजयी होण्याची खात्री होती; तेव्हा शौल देखील दाविदास म्हणाला जा, परमेश्वर तुझ्याबरोबर असो.

शौलाने आपला पेहराव दाविदास लेवविला, यापूर्वी त्याला त्याचा सराव नव्हता, म्हणून त्याने ती सर्व उतरुन ठेविली. त्याने आपली काठी हाती घेतली; ओहोळांतून पांच गुळगुळीत गोटे वेचून आपल्या धनगरी बटव्यात ठेविले आणि आपली गोफण हाती घेऊन तो त्या पलिष्ट्याकडे गेला. पलिष्ट्यास दाविद तुच्छ वाटला, कारण तो अल्पवयी असून तांबूस रंगाा व सुकुमार होता. त्याने आपल्या देवाची नांवे घेऊन दाविदास शिव्याशाप दिले. तो दाविदास म्हणाला असा जवळ ये म्हणजे तुझेमांस आकाशांतील पक्षांस व वनपशूंस देतो. दाविद पलिष्ट्यांस म्हणाला,....

"तू तरवार भाला व बरची घेऊन मजवर चढून आला आहेस, पण इस्राएली सैन्यांच्या देवाला तूं तुच्छ लेखिले आहे, त्या सेनाधीश परमेश्वराच्या नामानें मी तुजकडे आलो आहे. आज परमेश्वर तुला माझ्या हाती देईल, मी तुझा वध करीन व तुझे शिर धडापासून वेगळे करीन... कारण हे युद्ध परमेश्वराचे आहे, तो तुम्हांस आमच्या हाती देईल." (१ शमुवेल १७:४५-४७)

दाविदाने आपल्या बटव्यात हात घालून एक गोटा घेऊन गोफणीत घातला आणि ती गरगर फिरवून पलिष्ट्याच्या मस्तकावर असा मारीला की ते त्याच्या कपाळांत घुसून तो जमिनीवर पालथा पडला! दाविदाने धावून जाऊन त्या पलिष्ट्याच्या छातीवर पाय दिला व त्याचीच तरवार म्यानांतून काढून त्याला ठार करुन त्याचे शिर छेदिले. आपला महावीर गत झाला हे पाहून पलिष्टी पळऊन गेले. मग इस्राएल व यहूदी उठले आणि गथ व एक्रोन येथवर पलिष्टाचा पाठलाग करीत गेले. दाविदाने त्या पलिष्ट्याचे शिर यरुशलेमात नेले.

इस्राएलांकरीता तो विजयाचा आणि आनंद साजरा करण्याचा दिवस होता. इस्राएलाचा सर्व नगरातून स्त्रिया बाहेर निघाल्या आणि डफ व झांजा वाजवून गात म्हणत होत्या - "शौलानें हजारो वधिले, दाविदाने लाखो वधिले."

शौलास हे शब्द ऐकून आवडले नाहीत; त्याला फार क्रोध आला. त्या दिवसापासून पुढे शौलेने दाविदावर डोळा ठेविला. दाविदाला देण्यात आलेला सन्मान शौल पचवू शकला नाहि. दाविद आपला जीव वाचविण्यासाठी कांहि जणांना बरोबर घेऊन डोंगरात - गुहांत पळाला. दोनदा दाविद शौलाचा वध करण्याकरिता शौलाच्या अगदि जवळ गेला. परंतु शौलाला कांहि अपाय करण्यापासून स्वतास सावरीले. त्याने त्याच्या माणसांस म्हटले, "मी आपल्या स्वामीवर, परमेश्वराच्या अभिषीक्तमावर आपला हात टाकावा अशी गोष्ट परमेश्वर मजकडून न घडवो, कारण तो परमेश्वराचा अभिषिक्त आहे. (१ शमुवेल २४:६)

दाविद जिफ रानात निघून गेला. शौलाच्या माणसांनी त्याचा पाठलाग केला. दाविद शौलाच्या अगदि जवळ पोहोचला; परंतु त्याने आपल्या लोकांस परमेश्वराच्या - अभिषिक्तास आपाय करु नका असे सांगितले. या वेळेपर्यंत शमुवेल मृत्यु पावला होता व लोकांनी त्याला शमा येथेल त्याच्या मूठमाती दिली.

शौलाचे आता वाईट दिवस आले. पलिष्टी त्याजशी लढण्याकरिता शूनेम येथे चावणी देऊन राहिले. शौल आता त्याचे भविष्य जाणून घेण्याकरिता भूतविद्याप्रवीण स्त्रीकडे गेला. त्याला तिच्याकडून चांगली बातमी मिळाली नाहि. युद्धास सुरवात झाली त्यात शौल आणि त्याचे पुत्र मारिले गेले. दावीद सिकलाग येथे होता.

त्यानंतर दाविदाने देवाला प्रश्न विचारिला की "मी यहूदाच्या एकाद्या नगरात जाऊं काय?" देवाने त्यास 'हेब्रोनास' जाण्यास सांगितले. तेथे यहूदी लोकांनी जाऊन दाविदास अभिषेक करुन यहूद्याच्या वंशाचा राजा नेमिले. त्यावेळेस तो तीस वर्षांचा होता. त्याने चाळीस वर्षे राज्य केले. दाविद आणि त्याच्या लोकांनी यरुशलेमवर स्वारी केली व ते संपूर्ण इस्राएलची राजधानी केले.

खरे पाहिले तर दाविद हा इस्राएलावर राजा असावे हि देवाची इच्छा होती. लोकांच्या हट्टामुळे देवाने त्यांना शौलाची राजा व्हावे म्हणून परवानगी दिली. ती देवाची मनापासून इच्छा नव्हती.

## दाविद राजाचे सद्गुण :

१) दाविदाने प्रत्येक बाबतीत देवाची स्तुति केली. देवाच्या गौरवार्थ त्याने ७३ पेक्षा अधीक स्तोत्रे लिहिली.

२) अबीमलीखाने जरी पलिष्ट्याच्या देशात रहाण्याची दाविदाला नाकारली तरी देखील त्याने देवाची स्तुति केली. "परमेश्वराचा धन्यवाद मी सर्वदा करीन; माझ्या मुखांत त्याचे स्तवन सतत असेल." (स्तोत्र ३४:१)

३) देवाने त्याला राजा केल्याबद्दल तो देवाला कृतज्ञ होता. "त्याने त्यास मेंढरांच्या कोंडवाड्यातून घेतले; आपली प्रजा म्हणजे याकोबाची संतति, आपले वतन इस्राएल लोक याचे पालन करण्यास, दुभत्या मेंढ्यामागे तो होता तेथून त्याने त्यास आणिले आणि त्याने आपल्या मनाच्या सरळतेने त्यांचे पालन केले; आपल्या हातांच्या चातुर्याने त्यास मार्ग दाखविला." (स्तोत्र ७८:७०-७२)

४) दाविदा विषयी देव बोलला, "... इशयाचा पुत्र दाविद मला मिळाला आहे, तो माझ्या सर्व इच्छा सिद्धीस नेईल." (प्रे. कृ. १३:२२)

५) दावीदाने जवळ-जवळ शेजारील सर्व राज्यांवर विजय मिळविला आणि त्यांना कर देण्यास भाग पाडले. युद्धावर जाण्याअगोदर तो देवाचा सल्ला घेण्यास कधीहि विसरला नाहि. देव त्याच्यासाठी लढला.

६) तरुण असताना त्याने कळपातील मेंढ्यांवर हल्ला करण्यास आलेल्या सिंह आणि अस्वल यांना स्वत:च्या हातांनी ठार मारीले. स्वत:च्या जीवाची त्याने पर्वा केली नाहि. येशूने म्हटले, "मी उत्तम मेंढताळ आहे, उत्तम मेंढपाळ मेंढरांकरिता आपला प्राण देतो." त्याच्या या प्रवृत्तीमुळे देव दावीदाला राजा करण्यास प्रभावीत झाला.

७) त्याने उत्तम प्रकारे राज्यकारभार चालविला. तो इस्राएलात झालेल्या राजांमध्ये उत्तम राजा होता, सर्व प्रजा त्याजवर खुष होती.

८) देवाने दावीदाला आश्वासन दिले, कि त्याच्या मृत्युनंतर त्यांच्या पोटच्या वंशजास त्याच्यामागून स्थापून त्याचे राज्य स्थिर करील. तो देवाच्या नामाप्रीत्यर्थ मंदिर बांधील, आणि त्याचे राजासन कायमचे स्थापणार.

९) असे असले, तरी दाविद दोषरहित नव्हता. त्याने उरीयाहित्ती याची बायको तिजशी घृणास्पद अपराध केला. तिचा पती युद्धावर गेला होता. दाविद राजमंदिराच्या गच्चीवर फिरत असताना त्याला एक स्त्री स्नान करीत असलेली दिसली. त्याने माणसे पाठवून आपल्या राजवाड्यात आणले आणि तिजशी प्रसंग केला. ती गरोदर आहे असे त्याला कळल्यावर दाविद अस्वस्थ झाला आणि तीच्या पतीचा शेवट करण्याचा विचार करु लागला. त्याने अतिशय कुथुक्तिने तो घडवून आणला. नाथान संदेष्ट्याने ते पाप त्याज समोर उघड केले. दाविदाने पाप कबूल केले. पश्चाताप केला. परंतु त्याला देवाकडून त्याच्या दुष्कर्माबद्दल शिक्षा देणे भाग होते - जरी ते देवाच्या अंत:करणाजवळ होता तरी देखील शिक्षा करणे भाग होते. शिक्षा अतिशय कडक होती. देवाजवळ त्याचे क्षमायाचना केली देवाने देखील त्याच्या विपुल कृपेनुसार त्याला क्षमा केली.

दाविद राजा हा सर्व पातळ्यांवर इस्राएलचा सर्वश्रेष्ठ राजा होता. त्याच्या व्यस्त कार्यक्रमामध्ये देखील तो देवा बरोबर चालत असे. तो राजा होता, त्याबरोबर थोड्या कालावधीसाठी म्हणजे देवाचा कोश यरुशलेममध्ये आणण्या करिता याजक होता. येशू ख्रिस्ताच्या वंशावळीत दाविद एका मोठ्या स्थानासाठी पात्र होता.

## येशू ख्रिस्त !

येशू ख्रिस्त हा देव आहे. तो त्रैकयातील एक सभासद आहे. त्याला देवाचा पुत्र म्हणतात. तो राजा आणि महायाजक देखील आहे. तो या जगात जगातील लोकांच्या पापाकरिता अर्पणाचा कोकरा म्हणून आला. तो या पुढे राजा आणि महायाजकाच्या स्वरुपात ज्याला-प्रारंभ नाहि अंत नाहि. मलकिसदेकाच्या भूमिकेत येणार. पुनरुत्थाना नंतर ख्रिस्त सध्या देवाच्या उजव्या हाताजवळ बसलेला आहे. (स्तोत्र ११०:१)

## येशूला सर्व अधिकार देण्यात आले आहेत

पित्याने जगाचा न्याय करण्याचा अधिकार येशूला दिला आहे. (योहान ४:२२). पित्याने आपल्या हाती सर्व दिले आहे, आपण देवापासून आलो आहोत व देवाकडे जातो हे येशूला ठाऊक होते. हे जाणून येशू शिष्यांचे पाय धुऊ लागला अशा प्रकारे नम्र झाला. (योहान १३:३-५) पुनरुत्थाना नंतर येशूने शिष्यांना म्हटले, स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिला आहे; यास्तव तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रातील लोकांस शिष्य करा; त्यांस पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नामाने बाप्रिस्मा द्या.'' (मत्तय २८:१८-१९)

## येशू परत येणार आहे!

आबेला पासून ते बाप्रिस्मा करणाऱ्या योहाना पर्यंतचे सर्व नितीमान सुखलोकास विश्रांती घेत आहेत. नव्या कराच्या दिवसात ख्रिस्तामध्ये मृत्यु पावलेले देखील सर्व सुखलोकात विश्रांती घेत आहेत. पवित्र शास्त्र असे सांगते, ''कारण, प्रभु स्वत: आश्व्यदिव्यदूताची वाणी व देवाच्या तुतारीचा आज्ञाध्वनि होत असता स्वर्गातून उतरेल आणि ख्रिस्तामध्ये जे मेलेले आहेत ते पहिल्याने उठतील. मग जीवंत उरलेले आपण त्याजबरोबर प्रभुला सामोरे होण्यासाठी मेघारुढ असे अंतराळात घेतले जाऊ, आणि तसेच सर्वदा प्रभूजवळ राहू. (१ थेस्सल ४:१६-१७). पुनरुथाना नंतर प्रभु येशू ख्रिस्त आपल्याला स्वर्गात घेऊन जाईल!

प्रभुच्या दुसऱ्या येण्याची वेळ कोणालाहि ठाऊक नाहि! काहि लोक म्हणतात, प्रभुचे येणे हे ख्रिस्त विरोध्याच्या अगोदर होईल, ज्यामुळे निवडीलेल्यांना त्यांच्या त्याच्यासमोर जावे लागणार नाहि. त्याच्या फसव्या अधिकाराला सामोरे जावे लागणार नाहि. काहि जण २ थेस्सल २:३ हे वचन उल्लेखून म्हणतात, ''... त्या दिवसाच्या अगोदर धर्मत्याग होऊन पापपरुष प्रकट होईल.'' कसेकां असेना ख्रिस्त जे नितीमान मेलेले आहेत आणि जे ख्रिस्तामध्ये मृत पावलेले आहेत, त्याजमध्ये जीवंत आहेत त्यांना घेऊन जाण्यासाठी येणार आहे. हि एक शक्यता आहे. हे जगाच्या प्रारंभापासून म्हणजे आदामा पासून ते प्रभुच्या येण्याच्या ६००० वर्षांपेक्षशंच्यां अधिक काळाचे फळ आहे.

देव राज्याबद्दल येशू ख्रिस्त दुसऱ्या शक्यतेवर दृष्टि ठेवून आहे. ते ज्यांच्यावर शिक्षा करण्यात आला त्यांची संख्या इस्राएलाच्या एकूण बारा वंशातील प्रत्येकी १२००० म्हणजे १४४ हजार आहे. या यादित दान वंश वगळण्यात आलेला आढळतो. कारण त्यांनी मूर्तिपूजेमध्ये सामिल झालेले होते. (उत्पत्ति ४९:१७, शास्त्रे १८:३०, १ राजे १२:२८, २९) तरी देखील मनशस्शे वंशाला सामील करुन घेण्यात आल्यामुळे १२ हा आकडा कायम रहातो. प्रभु इस्राएलांच्या १४४ हजारांना विशेष लेखून त्यांना हजार वर्षांच्या अधिकारात सामिल होण्याची परवानगी देणार. नोहाचे आठ जणांच्या कुटुंबाची ४००० वर्षांच्या काळात ७०० कोटिपेक्षा अधिक वृद्धि झाली. (२००१ + २०००) म्हणजे तोहापासून ते आजपर्यंत! याचा अर्थ हे १४४ हजार लोक १००० वर्षांच्या काळात ज्यामध्ये प्रभु राज्य करणशर त्या काळात ७०० कोटिंची भर पडणार. या हजार वर्षाच्या काळात निवडलेले, ते दूतांप्रमाणे शांत राहून निरिक्षण करणार. तेव्हा देवाच्या राज्यात, अगोदरचे निवडलेले आणि भविष्यात बहुसंख्यांमधून निवडीले जातील ते १४४ हजारांवर जाण्याची शक्यता आहे. हा मोठा जमाव पाहून देव जो पिता, देव जो पुत्र ते हर्ष करितील!

तेव्हा सर्व स्थरांवर येशू ख्रिस्त जो राजा आणि महायाजक तो मलकीसदीका पेक्षा अधिक प्रेम आणि सन्मान उपभोगणार प्रभु करो आणि आपणा सर्वांना त्या अभ्यूत स्थळी, देव राज्यात अनंत काळा करिता नेवो!

***



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

### माझी पार्श्वभूमी

आम्ही आमच्या ''त्याच्या बोलविण्याचा प्रतिध्वनी'' मासिकात देवाच्या महान कृपे द्वारे ''खड्यातून महालापर्यंत'' ("Pit To Palace" असे शिर्षक असलेली मालीका अनेक वर्षांपासून प्रसिद्ध करीत आहोत. त्या लेखांमध्ये देवाने मला कश्याप्रकारे मार्गदर्शन करीत आला त्याविषयी लिहिले आहे.

पवित्र आत्म्याने देखील मला प्रेरणा दिली की मी, देवाने मला माझ्या जीवनात अगदी सुरवातीपासून कशा प्रकारे चालविले आणि वर उचलले ते सर्व अनुभव पुस्तक रुपाने लिहून काढावेत. आजारी असताना आणि इतर प्रसंगात मी जी वचने दिली, आणि माझ्या काही वाचकांनी दिलेल्या भरीव सदिच्छांनी मला हे पुस्तक लिहिण्यास प्रवृत्त केले.

या कामास अनेक वर्षे विलंब लागला. ४ डिसेंबर २०२१ रोजी रविवारी अनेपेक्षितपणे आमच्या मंडळीत ''फ्रेंडस् डे'' म्हणून कार्यक्रम होता त्यात माझ्या मुलाचा ॲलिकस् सॅमसन सॅमचा जन्मदिन देखील साजरा करण्यात आला. सर्व कार्यक्रम संपल्यानंतर मी रात्री १२ वाजण्याच्या सुमारास झोपण्यास गेलो. त्या रात्री जवळ-जवळ ४ तास पवित्र आत्मा माझ्या आंतरमनात आणि स्वप्नात मजशी कार्य करीत होता.

पहाटे ठीक ३च्या सुमारास प्रभु येशू ख्रिस्तानें मला झोपेतून उठविले आणि या पुस्तकावर काम करण्यास सुरवात करण्यास लावले. त्याने माझ्या नेत्रांसमोर हे वचन आणिले. ''...तो एकटा होता तेव्हा त्याला मी बोलाविले व त्याला आशीर्वाद देऊन त्या एकाचे पुष्कळ केले.'' (यशया ४२:२)

त्यानंतर त्याने मला बायबल, वहि व पेन हातात घेण्यास भाग पाडिले. मी गुडघे टेकून बोललो, ''प्रिय पित्या! मी तुझ्या आज्ञेचे पालन करितो आणि माझ्या जीवना विषयीचे खरे-खुरे आत्मचरित्र लिहिण्यासाठी स्वत:ला समर्पित करीतो. कृपया हे पुस्तक लिहून पूर्ण करिपर्यंत आणि ते अनेक भाषांमध्ये प्रसिद्ध करीपर्यंत मला तुझ्या कृपाछत्राखाली राख.'' देवाने या कामास सुरवात करण्यासाठी मला विश्वास दिला.

माझ्या बालपणाचे फोटो माझ्याकडे नाहित. तेव्हा प्रभुने मला माझ्या कार्यालयात सहाय्यकाचे काम करणाऱ्या सिस्टर डेझी रानी ला रेखाचित्र काढण्या संबंधी जाऊन विचारण्याची प्रेरणा दिली. तिने देखील तशा प्रकारची रेखाचित्रे रेखाटण्यास मान्य केले.

अशा परिस्थितीत मी पुस्तक लिहिण्यास सुरवात केली.

### माझे बालपण

माझी आई रोझलेट हि भारतातील अगदी दक्षिण टोकाकडील भागातील कन्याकुमारी जिल्ह्यातील, नेय्युर शहरातील नेल्लाराईकोनम गावातील होती. माझे पणजोबा, मिस्टर मारथांदन हे तिशय कर्मठ हिन्दु भक्त होते. त्यांचा मुलगा, मिस्टर नारायणन जे माझे आजोबा, जे देखील कर्मठ हिन्दु होते. काहि समयानंतर ते दक्षिण भारतीय चर्चच्या सुवार्तेच्या कार्या द्वारे ख्रिस्ती बनले. माझ्या आजोबांचे नाव ''नथानिएल'' असे बदलण्यात आले. त्यांनी ''गन्नापू'' नावाच्या कोलाचेल दक्षिण भारतीय ऊध्यारविलाई चर्च मधील विवाह केला. त्यांची प्रथम जन्मलेली मुलगी रोझलेट हि माझी आई होती.

माझ्या वडिलांचे नाव मिस्टर सेलवा दास आणि त्यांचे वडिल (माझे आजोबा) मिस्टर सॅम्युएल हे नेय्युर येथील दक्षिण भारतिय नेल्लाराईकोन्नम चर्चचे सभासद होते. माझ्या वडिलांची आई मिसेस मुथ्याम्मल हि पल्लीयादी येथील होती आणि ती विश्वासणाऱ्यापैकी एक होती. माझे आजोबा मिस्टर सॅम्युएल हे दक्षिण भारतिय नेय्युर चर्चच्या प्रसिद्ध दवाखान्या कपौंडरचे काम करीत होते. त्यांना डॉ. सामरवेल या युरोपीयन डॉक्टरांच्या हाताखाली काम करण्याची संधी मिळाली. या डॉक्टरांनी जगातील सर्वात उंच


## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. **'सर्टफिकेट इन मिनिस्ट्री'** प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**

Echo of His Call, Post Box 2957

CHEPAUK, CHENNAI - 600 005.

Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,

Cell : 98410 71852, 95661 31858

E.mail : biblecor@yahoo.co.in

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

एव्हरेस्ट पर्वतावर चढण्याचा विक्रम केला होता. माझ्या आजोबांनी त्यांची वैद्यकिय सेवा हि देवाची केलेली सेवा होती असे मानीत होते. आणि ते त्यांच्या लेकरांसमोर आणि मंडळी समोर एक आदर्शमय जीवन जगले. माझ्या आजी-आजोबांनी माझ्या आत्मिक जीवनासाठी मजबूत असा पाया तयार केला.

**(पुढील अंकात चालू राहिल)**

*****

## OUR BANK DETAILS:

### *1. Bank : State Bank of India*

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

### *2. Bank : ICICI Bank*

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

### *3. Bank : State Bank of India*

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**

*****

**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-     आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/21-23**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th FEBRUARY 2022**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

## *JESUS LOVES YOU!*

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by him at **Echo of His Call Printers**, New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**